



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार २० ऑक्टोबर २०२४ | अंक३१४ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# विधानसभा निवडणूक लढवायची की नाही? मनोज जरांगे यांच्या बैठकीत काय ठरले?

**बीड प्रतिनिधी :- गोकुळ इंगोले**

जालना : महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे ( २०२४) बिगुल वाजले आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेल्या अनेक महिन्यांपासून रस्त्यावर उतरलेले मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी राज्यात निवडणुका जाहीर होताच आपला संताप व्यक्त केला. आता या निवडणुकीमध्ये निर्णायक मतदान हे मराठ्यांचे आहे. आता रणशिंग फुंकले आहे. लढाईला उतरायचं म्हणजे तलवार काढावी लागेल. सरकारने मराठा आरक्षणाबाबत आमची आशा संपवली असल्याचे त्यांनी म्हटले होते. दरम्यान, मनोज जरांगे पाटील आगामी विधानसभा निवडणुकीत (२०२४) उमेदवार पाडायचे की लढवायचे याचा निर्णय समाज बांधवांसमोर निर्णायक बैठकीत उद्या (ता.२० सप्टेंबर) घेणार असल्याचे त्यांनी सांगितले आह लढायचं ठरलं तर आमच्यासाठी वेळ कमी नाही. आमची गेल्या १३ महिन्यापासून तयारी सुरू आहे. महाविकास



आघाडी आणि महायुतीकडे देखील टफ उमेदवार आहेत. मात्र यातून त्यांना द्यायचा एक आहे. तसेच माझ्याकडे पण लय इच्छुक आहेत. आम्ही एक जरी उमेदवार दिला १०० जरी इच्छुक असले तर सर्वजण एकाचाच बाजूला उभे राहतील. २० आणि २५ दिवसात माझ्या विरोधात खूप मोठा डाव रचला आहे. केंद्र आणि राज्यातल्या कोणत्यातरी एका नेत्याकडे ताकद पुरवली आहे. त्याच्या पाठीशी कॅम्पिनिग होणार, वेळ आली तर त्याच्या नावाची समाजासमोर चिरफाड करणार. मला या चळवळीतून खतम करायचा, गैरसमज कसा फैलावयचा याची कंपनिग होणार आहे. निर्णय उद्या काय होईल माहिती नाही. पण जे काही ठरेल एक ही गरीब सामान्य ओबीसी सहित मी त्यांना वापस जाऊ देणार नाही. २०२४ मध्ये ७५ वर्षात बघितलेले स्वप्न साकार होईल

### समाजबांधवांसमोरच आम्ही निर्णय जाहीर करणार- मनोज जरांगे

विधानसभा निवडणुकीत उमेदवार पाडायचे की उमेदवार उभे करत लढायचं यासाठीच समाज बांधवांसमोर उद्या निर्णायक बैठक होणार आहे. यावेळी या बैठकीला जेवढे समाजबांधव येतील त्यांच्या समोरच आम्ही निर्णय जाहीर करणार.अशी माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे. राज्यात महाविकास आघाडी असो की महायुती त्यांना संताजी धनाजी सारख पाण्यात मीच एकटाच दिसतो. माझ्यावर कोणाचाच अस्त्र चालू शकत नाही.त्यामुळे उद्या वेळ आली तर मी मराठ्यांसाठी मी मरेलही. सरकारकडे आणि विरोधकांकडे शेवटच अस्त्र तेच आहे. एक तर मला मारून टाकावे लागल. मात्र मी मरेल पण पैशावर आणि पदावर फुटू शकत नाही. माझ्या जवळच्या असणार्या लोकांना देऊन जर तुम्ही डाग लावण्याचा प्रयत्न केला असल तर तो घेणारा संपणार आणि देणारा सुद्धा संपवणार, असा इशारा ही मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी दिला आहे.

## परळी नगर पालिकेने सर्वसामान्य जनतेला लावला १०० कोटींना चुना!

**जनहितासाठी राजेभाऊ फड सरसावले; उच्च न्यायालयात जनहितासाठी केली याचिका**

**दैनिक लोकआरंभ//**

परळी (प्रतिनिधी) परळी नगर पालिकेकडून अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली आहे. परळी नगर पालिकेने जनतेची गैर कायदेशीर मार्गाने जवळपास 100 कोटी रुपयांची फसवणूक केली आहे. वास्तविक पाहता अशा स्वरूपाचा कर घेण्याबाबत कुठलेही आदेश नाहीत किंवा कुठलाही शासन आदेश नाही. मालमत्ता करापोटी शासन नियमानुसार भरलेल्या पैशांपेक्षा एक टक्का अतिरिक्त शुल्क नगर पालिकेकडून वसूल केले जात आहेत. हा प्रकार नियमबाह्य असून, हेच पैसे जनतेला परत करा व यापुढे असा कर वसूल केला जाऊ नये अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे. यासंदर्भात पुढील सुनावणी येत्या 27 तारखेला ठेवण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,परळी वैजनाथ नगरपरिषद परळी वैजनाथ या कार्यालयात मालमत्तेची नोंदणी करण्यासाठी नाव नोंदणी अर्ज दाखल केल्या नंतर सदरील मालमत्तेच्या नावाची नोंदणी प्रमाणपत्र देते वेळी अनाधिकृतपणे कर आकाराला जातो व शहरातील नागरिकांवर त्याचा विनाकारण भुर्दंड पडतो. अशा प्रकारचा कर आकारण्याची कोणताही तरतूद नगरपरिषद कायद्यामध्ये, नियमा मध्ये व शासन निर्णयामध्ये नसतानाही सामान्य नागरिकांना वेठीस धरून अशा प्रकारची कर वसुली परळी नगरपरिषद कार्यालयामार्फत केली जाते अन्यथा त्यांच्या मालमत्तेची नोंद नगरपरिषद कार्यालयामध्ये घेतली जात नाही. नाइलाजास्तव परळी शहरातील नागरिकांना इच्छा नसतानाही कर भरावा लागतो. सदरील काराबद्दल राजेभाऊ श्रीराम फड यांनी वेळोवेळी मुख्य अधिकारी परळी नगरपरिषद परळी वैजनाथ यांच्याकडे लेखी अर्ज देऊन सदरील कराबद्दलची माहिती मागितली असता त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली शेवटी दिनांक २४/०६/२०२४ रोजी केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये सदरील काराबद्दल माहिती मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला असता मुख्य अधिकारी परळी नगरपरिषद यांनी सदरील कराबाबत माहिती दिली नाही व वर्षानुवर्षे अशा प्रकारचें अनाधिकृतपणे कर वसुली करत आहेत. याबाबत राजेभाऊ श्रीराम फड यांनी मा उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे अँडव्होकेट श्री यावलकर व अँडव्होकेट श्री नागरगोजे यांच्या मार्फत याचिका दाखल केली. सदरील याचिकेमध्ये मा न्यायालयास विनंती केली कि सदरील कर आकारणी चुकीची आहे व ती रद्द ठरवावी व दुसरी विनंती अशी केली कि नगरपरिषद परळी वैजनाथ यांनी आजपर्यंत आजपर्यंत नाव नोंदणी (पीटीआर) साठी जी रक्कम परळी शहरातील नागरिकांकडून अनाधिकृत पणे वसूल केली आहे ती रक्कम त्यांना नगरपरिषद कडून परत मिळावी अशी विंनती करून याचिका दाखल केली असता सदरील याचिकेमध्ये दिनांक १६/१०/२०२४ रोजी सुनावणी झाली. सदरील याचिकेवर मा. न्यायामूर्ती अवचाट साहेब व धोटे साहेब यांनी नगर परिषद परळी वैजनाथ यांना नोटीस काढून पुढील सुनावणी दिनांक २७/११/२०२४ रोजी मा उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे ठेवण्यात आलेली आहे.

## टीम इंडियाची विजयी सलामी, पाकिस्तानला पहिल्याच सामन्यात ७ धावांनी लोळवलं

**एसीसी इमर्जिंग टीम्स आशिया कप २०२४ स्पर्धा सुरु आहे.**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात एसीसी इमर्जिंग टीम्स आशिया कप स्पर्धेतील पहिला सामना पार पडला. या सामन्यात भारताचा वरचष्मा दिसला. भारताने नाणेफेकीचा कौल जिंकताच प्रथम फलंदाजीला प्राधान्य दिलं. तसेच 20 षटकात 8 गडी गमवून 183 धावा केल्या आणि विजयासाठी 184 धावांचं आव्हान ठेवलं. पाकिस्तानने 20 षटकात 7 गडी गमवून 176 धावा केल्या. हा सामना भारताने 7 धावांनी जिंकला. यासह स्पर्धेत भारताने विजयी सलामी दिली आहे. भारताकडून अंशुल कंबोजने सर्वाधिक 3 विकेट घेतल्या. तर रसिख दार सलाम आणि निशांत सिंधूने प्रत्येकी दोन गडी बाद केले. भारताकडून अभिषेक शर्मा आणि प्रभसिमरन सिंगने आक्रमक सुरुवात करून दिली. पॉवर प्लेमध्ये या जोडीने 68 धावा ठोकल्या. अभिषेक शर्मा 22 चेंडूत 35 धावा करून बाद झाला. त्याने 5 चौकार आणि 2 षटकार मारले. तर प्रभसिमरनने 19 चेंडूत 3 चौकार आणि 3 षटकाराच्या मदतीने 36 धावा केल्या. त्यानंतर कर्णधार तिलक वर्माने आक्रमक खेळी केली. दोन चौकार आणि दोन षटकार मारत 44 धावा केल्या. त्याला नेहल वढेराची साथ मिळाली त्याने 22 चेंडूत 25 धावा केल्या. या व्यतिरिक्त इतर फलंदाज काही खास करू शकले नाही. आयुष बदोनी फक्त 2 धावा करून बाद झाला.

## देवेंद्र फडणवीस यांनी तोंडचा घास हिरावला, मनोज जरांगे पाटील यांची जोरदार टीका

मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी उद्या 20 ऑक्टोबर रोजी आंतरवली सराटीत बैठक घेऊन उमेदवारांना पाडायचे की आपले स्वत:चे उमेदवार उभे करायचे याचा निर्णय घेणार आहे. माझा मराठा समाज माझ्यापाठी आहे, मला वारंवार शक्ती प्रदर्शन करायची गरज नाही. लोकांनी टीका केली होती की मनोज जरांगे पाटील यांना लोकसभेपुरता पाठींबा होता त्या लोकांची तोंडे दसरा मेळावा पाहून बंद झाली असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. मराठा समाज भाजपात मोठ्या प्रमाणात आहेत. भाजपातील मराठ्यांना देखील वाटत होते फडणवीस न्याय देतील. परंतू त्यांनी जातींना ओबीसीत घातले परंतू मराठ्यांना नाही हे पाहून भाजपातील मराठे देखील नाराज झाले आहेत असेही जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मराठ्यांच्या तोंडाशी आलेला घास घालवला असल्याची टीकाही जरांगे पाटील यांनी केली आहे. लेकरंच जर जगली नाहीत तर नेत्याला मोठा करुन काय करायचं, नेत्यांची पोरं परदेशात शिकत आहेत. नाईलाजाने मला राजकारण शिकावं लागलं आहे असेही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

# डॉ.योगेश क्षीरसागरांचा सकाळी ग्रामीण भागात तर संध्याकाळी बीड शहरात दौरा

**ह.भ.प. नवनाथ बाबांचे आशिर्वाद घेऊन डॉ.योगेश क्षीरसागरांची दौऱ्याला सुरुवात**



**बीड प्रतिनिधी,**

दि.१८ : महायुतीकडून बीड विधानसभेची जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षालाच सुटणार आणि आपल्यालाच उमेदवारी मिळणार, असा विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा डॉ.योगेश क्षीरसागर यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील दौऱ्याला शुक्रवारी (दि.१८) सुरुवात केली. तत्पूर्वी, त्यांनी शांतिब्रह्म ह.भ.प. नवनाथ बाबांचे आशिर्वाद घेतले. बीड तालुक्यातील बकरवाडी, मन्यारवाडी, आंबेसावळीसह अनेक गावांमध्ये डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भेटी देत ग्रामस्थांशी संवाद साधला. या दौऱ्यात जि.प.चे माजी सदस्य तथा सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, पं.स.चे माजी उपसभापती अरुण लांडे, सरपंच बाबासाहेब पवार, भिकाराम शिंदे, शिवाजी मुंडे, जानकीराम काळे, सखाराम काळे, एकनाथ पवार, रितेश लांडे, सतिश काळे, सिताराम गाडे, पोपट काळे, प्रकाश पोपळे, ज्ञानोबा शिंदे, परमेश्वर शिंदे, सिद्धेश्वर पोपळे, उत्तम शिंदे, माजी सरपंच प्रदीप गुंदेकर, कुंडलिक बांडे, पवन गुंदेकर, सौरभ गुंदेकर, ज्ञानेश्वर बांडे, जयराम गुंदेकर, व्यंकटेश गुंदेकर, हनुमंत बांडे, मच्छिंद्र बांडे, विश्वंभर नवसागर, विष्णू गुंदेकर आदींची उपस्थिती होती. तसेच, सकाळच्या सत्रात ग्रामीण भागात दौरा केल्यानंतर सायंकाळी बीड शहरातील प्रभाग क्रमांक १, २ भागातील कॉर्नर बैठका घेतल्या. ठिकठिकाणी स्थानिक नागरिकांसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर पहिल्याच दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

### शिवसनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांची भेट; अनेक कुटुंबियांच्या गाठीभेटी

बीड तालुक्यातील आंबेसावळी येथे रेडे, डोंगरे परिवाराच्या विवाह सोहळ्यास भेट दिली. तसेच, परमेश्वर गुंदेकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देत यांच्या प्रकृतीविषयी विचारपूस केली. राजेंद्र व महादेव गुंदेकर यांचे वडील स्व.दामोधर गुंदेकर यांचे काही दिवसापूर्वी निधन झाले. त्यामुळे गुंदेकर कुटुंबियांचे सांत्वन केले. ग्रामीण भागाचा दौरा पूर्ण झाल्यानंतर बीडमध्ये महायुतीतील मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांची भेट घेतली. ते गेल्या काही दिवसांपासून आजारी असल्याने त्यांची भेट घेत प्रकृतीविषयी विचारपूस केली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २० ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com



# कुटुंब वत्सल वडील कै दिनकरराव गित्ते बेलंबेकर

बेलंबा गावचे रहिवासी कै दिनकरराव गित्ते यांचे पुण्यस्मरण दि 20 रोजी बेलंबा येथे साजरे होणार आहे, त्यानिमित्ताने कै दिनकररावजी गिते यांच्या चरित्रावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करत आहे. दिनकरराव गिते हे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जीवन जगणाऱे व्यक्तिमत्व होते. अतिशय हलाखीच्या परिस्थितीमध्ये त्यांनी आपला संसार चालवला, शेती बरोबरच लहान सहान व्यवसाय सुद्धा करुन पाहिले आडत दुकानात कामही केले. गावात चौथी पर्यंत शाळा असल्याने मुलांना परळीला पायी शाळेत जावे लागत असे,तशाही परिस्थितीत आपल्या मुलांना उच्च विद्याविभूषित केले

आय एस अधिकारी माननीय श्री किरणकुमारजी गिते ,तसेच किशोरकुमार व कीर्तीकुमार हे इतर दोन चिरंजीव या तीनही मुलांना त्यांनी चांगले संस्कार -चांगले शिक्षण देऊन समाजामध्ये सन्मानाने उभे केले. मा किरणकुमारजी आज त्रिपुरा राज्याचे सचिव म्हणून कार्यरत आहेत तर इतर दोन मुले गावच्या विकासाची धुरा सांभाळत आहेत,ग्रामपंचायत च्या माध्यमातून सरपंच-उपसरपंच पदी काम करुन गावात विकासाची गंगा आणत आहेत. संत तुकाराम महाराज म्हणतात शुद्ध बीजापोटी/ फळे रसाळ गोमटी// अर्थातच दिनकररावजी आणि त्यांच्या पत्नी श्रीमती इंदुताई हे दोघे शुद्ध बीज असल्यामुळेच त्यांच्या पोटी रसाळ गोमटी फळे जन्माला आली.



शास्त्रामध्ये एक प्रसिद्ध श्लोक आलेला आहे आई पुण्यवंत असेल तर मुले सुशील होतात, वडील पुण्यवान असतील तर मुले हुशार होतात,कुळाची पुण्याई असेल तर मुले दानशूर होतात आणि स्वतःची पुण्याई असेल तर मुले श्रीमंत होतात सुशिलो मातृपुण्येन ,पितृ पुण्येन चतुरता/दातव्यो वंश पुण्येन, आत्म पुण्येन सभाग्यता //..मा. किरणकमारजी गिते साहेबांसारखा मुलगा पोटी आला याचाच अर्थ आई इंदुमती आणि वडील दिनकररावजी खरच पुण्यवंत आहेत. ज्या काळामध्ये राहायला मनासारखे घर नव्हते, प्रवासाची साधने नव्हती, आणि खर्चासाठी मुबलक पैसाही जवळ नव्हता, अशा परिस्थितीत अतिशय कष्टमय जीवन जगून आपल्या मुलाला भारतीय सेवेमध्ये अधिकारी बनवायचे ही जिद्द मनाशी बाळगून कैलासवासी दिनकररावजींनी प्रवास केला.बाप खरच काय असतो हे दादांचे जीवन ज्यांनी जवळुन पाहिले त्यांच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही.

पुत्राच्या विजये/ पिता सुखावत जाये/ ..असे तुकाराम महाराज म्हणतात ते उगाच नाही. आई मुलाला कडेवर घेते आणि बाप मात्र मुलाला खांद्यावर घेतो, कारण आईला वाटतं मला जे दिसतं तेवढं माझ्या मुलाला दिसलं पाहिजे, पण बापाला वाटतं मला जे आयुष्यात पाहता आलं नाही ते सुद्धा माझ्या मुलाला पाहता आलं पाहिजे म्हणून बाप मुलाला खांद्यावर घेतो. बापाने मुलांसाठी अनेक स्वप्न पाहिलेले असतात, आणि ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी तो दिवस रात्र राबत असतो .हाडाची काळ करतो- रक्ताचे पाणी करतो -रात्रीचा दिवस करतो आणि मुलांच्या उज्वल भवितव्यासाठी राबराब राबतो.

स्वतः फाटके बनियान घालतो, मुलांना भरजरी कपडे देतो .स्वतः शेतात कष्ट करतो, मुलाला शहरात चांगल्या हॉस्टेलला ठेवतो. प्रसंगी स्वतः पाणी पिऊन उपाशीपोटी झोपतो ,पण पोरांना चांगल्या ठिकाणी जेवणाची मेस लावतो. स्वतः उन्हातानात काम करतो, पण मुलांना चांगल्या कॉलेजमध्ये ऍडमिशन मिळवून देण्यासाठी अट्टाहास करतो. बाप करी जोडी लेकुराचे ओढी/ आपुली कुरवंडी वाळवोनी//.... या न्यायाने कै दिनकररावजी जगले आणि मा किरणकुमार गिते साहेब व इतर दोन मुलांना घडवले. आज मा किरणकुमार गित्ते साहेबांच्या जीवनात सर्व काही आहे, दोन मुले आहेत, आमच्या भगिनी उषाताई सारखी कर्तबगार पत्नी आहे, आशिर्वचन द्यायला आमच्या दिनकर गुरुजी नाथरेकरासारखे सासरे आणि श्रीमती इंदुमतीताई सारखी आई आहेत, किशोरकुमार आणि कीर्तीकुमार सारखे पाठिंबा देणारे कणखर भाऊ आहेत. आमच्यासारखे प्रेम करणारे असंख्य मित्रवर्य आहेत .परंतु या सगळ्या गदारोळातही वडिलांची उणीव साहेबांना कुठेतरी जाणवल्याशिवाय राहत नाही...जेव्हा जेव्हा वडिलांची आठवण येते तेव्हा साहेबांचे डोळे पाणावल्याशिवाय राहत नाहीत हे आम्ही अनेक वेळा जवळून पाहिलेले आहे. कै दिनकरराव गित्ते दादांच्या पुण्यतिथीनिमित्त सलग बारा वर्षे माझी कीर्तन सेवा संपन्न झाली असल्यामुळे,मी अनेक वेळा हा अनुभव घेतलेला आहे.

अशा सोज्वळ- मितभाषी आणि अजातशत्रू जीवन जगून, समाजाच्या पदरात मा किरणकुमार गित्ते साहेबांसारखे रत्न टाकणारे कै दिनकरराव गित्ते दादांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करून लिखाण थांबवतो

लेखक
श्री ह भ प तुकाराम महाराज मुंडे
शास्त्री श्री रत्नेश्वर संस्थान टोकवाडी
मो 9145742777

# सहकारी-बँका व पतसंस्थानी इव्हेंन्ट करायला व प्रेझेंन्टेशन करायला हवे का?

सध्याचा काळ सर्व क्षेत्रात इव्हेंन्ट व प्रेझेंन्टेशनचा आहे.विवीध उद्योगात,व्यवसायात,कार्पोरेट, प्रायव्हेट,कर्मशियल बॅंकिंग सेक्टर मध्ये या साठी विशेष आर्थिक तरतुद तर केली जातेच पण यासाठी तंज्ञ स्टॉफ,एजन्सिजची ही नियुक्ती केलेली असते. या बाबत सहकार क्षेत्र फार माघे आहे. केंद्र सरकार सहकारा बाबत सकारात्मक असुन नवनवीन योजनांच्या माध्यमातुन ते लक्षात येते.देशातील,राज्यातील 30%+ लोकसंख्या विवीध माध्यमातुन सहकाराशी जोडलेली असीनही त्याचा फायदा अथवा लाभ सहकार क्षेत्राला घेता येत नाही असे नाईलाजास्त म्हणावे लागेल. या स्पर्धात्मक कालखंडात सहकार क्षेत्राने विशेषतः सहकारातील बॅंकिंग सेक्टरने या कडे लक्ष देणे गरजेचे आहे. पतसंस्था चळवळीत साधारणतः 13,000/-+ पतसंस्था आहेत व हा या क्षेत्रातील सर्वात मोठा आकडा आहे पतसंस्थानी प्रेझेंन्टशन व इव्हेंट मंनेजमेंट याकडे सकारात्मकपणे पहाणे अतीव गरजेचे आहे,आपली स्पर्धा खाजगी व व्यापारी बॅंकाशी आहे,ज्या विवीध माध्यमातुन ट्रेन व तंज्ञ स्टॉफच्या मदतीने ग्राहकां पर्यंत पोहचत आहेत. आपण यावर होणारा खर्च -खर्च न मानता गुंतवणुक मानायला हवी.संस्थेची जागा,इमारत,फर्निचर,रंगरंगोटी,स्टॉफची बैठक व्यवस्था,त्यांचे राहणीमान,त्यांची भाषा,देहबोली,त्यांची बोलण्याची पध्दत,ग्राहकांना सेवा देण्याचा उत्साह,संचालक मंडळाची मानसिकता हे व असे बरेच घटक प्रेझेंन्टेशन मध्ये येतात.यासाठी पदाधिकाऱ्यांचा पतसंस्था भेटीसाठी प्रवास,कर्मचाऱ्यांचे अभ्यास दौरे,प्रशिक्षण या माध्यमातुन इतर पतसंस्था काय करतात व आपण काय करायला हवे याचे चिंतन होईल. सध्याच्या काळात टिम म्हणुन सादरीकरण फार गरजेचे आहे.आपली पतसंस्था शिपाई यांचू पासुन अध्यक्षा पर्यंत कुणालाही ,कुठेही प्रेझेंन्ट करता यायला हवी,त्यासाठी वारंवार स्टॉफ व संचालक यांच्या मिटींग मधुन व तंज्ञाच्या मार्गदर्शनाखाली योग्य सादरिकरण करणे,करता येणे हे महत्वाचे आहे. त्याच बरोबर इव्हेंन्ट हा जनसंर्पकासाठी व ग्राहक वाढीसाठी सर्वोत्तम मार्ग आहे.आपल्या संस्कृतीत विवीध सण-समारंभ मोठ्या उत्साहाने व आनंदाने ते ही वेळ देवुन साजरे केले जातात.पतसंस्था वाढीसाठी आपणही दर दोन महिंन्यांनी संस्थेच्या,शाखांच्या जागेत कार्यक्रम आयोजीत केले पाहिजेत.प्रत्येक कार्यक्रम साजरे करताना ग्राहकांची मानसिकता ओळखुन त्यांचे नियोजन व्हायला हवे. दर कार्यक्रमातुन दरवेळी 100 नविन ग्राहक जोडण्याचे टारगेट शाखांना दयायला हवे.महिला,मुली,जेष्ठ महिला,मुले,पुरुष,जेष्ठ नागरिक यांच्या बरोबरच तृतिय पंथियां साठीही विशेष कार्यक्रम शोधायला हवेत. या कार्यक्रमानुसार विवीध स्पर्धा ,व्याख्याने,सन्मानसोहळे,बक्षिस वितरण,गुणवंताचे सत्कार,महिला दिन,बालक दिन,जेष्ठ नागरीक दिन हे असे समयोजित कार्यक्रमांचे वर्षाचे कॅलेंडर तयार करुन त्या त्या कार्यक्रमास तो तो ग्राहक व भविष्यातील संभाव्य ग्राहक यानां निमंत्रित करुन संस्था समाजा पर्यंत पोहचवणे आवश्यक झाले आहे.यासाठी आपणस आता बदलावे लागेल विवीध एजन्सी,इव्हेंट मॅनेजमेंट कंपन्या,डिजीटलायझेशन व्दारे ग्राहक संपर्क करणाऱ्या एजन्सीज बरोबर आऊट सोर्सिंग च्या माध्यमातुन यात लक्ष द्यावे लागेल.आपल्याला त्या दर्जाचा स्टॉफ ही घ्यावा लागेल.ही बदलत्या काळाची गरज आहे,सबल व सक्षम पणे बॅंकिग चळवळ उंचीवर नेण्यासाठी हे गरजेचे आहे,असे मला वाटते.

लेखक-
श्री.वासुदेव काळे
मो.नं.9822837025

# संभाजी ब्रिगेड प्रदेश प्रवक्तेपदी डॉ. सुदर्शन तारख यांची नियुक्ती

जालना- संभाजी ब्रिगेड प्रदेश प्रवक्तेपदी अंतरवाली सराटी (ता.अंबड) येथील डॉ.सुदर्शन श्रीकृष्ण तारख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष मनोज आखरे व महासचिव सौरभ खेडेकर यांनी एका पत्राद्वारे डॉ. तारख यांची नियुक्ती केली आहे.सदर नियुक्तीपत्रात म्हटले आहे की,संभाजी ब्रिगेड या वैचारिक, सामाजिक व राजकीय चळवळीसाठी आपण श्रम, वेळ, बुध्दी, कौशल्य व पैसा हे पंचदान देऊन या संघटनेत सातत्याने कार्यरत आहात.मागच्या 25 वर्षांपासून संभाजी ब्रिगेड मध्ये वेगवेगळ्या पदावर काम करत आहेत सध्या प्रदेश संघटक म्हणुन कार्य करत आहेत याच आपल्या या कार्याची दखल घेऊन आपली प्रदेश प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात येत आहे. आपल्या विचारकार्यातून पक्ष-संघटन व समाज संघटन बळकट होईल. महामानवांच्या विचारांची समतावादी व्यवस्था निर्माण होण्यासाठी आपले



योगदान महत्वाचे ठरणार आहे, असेही या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

या निवडीबद्दल डॉ.सुदर्शन तारख यांचे मुख्य प्रवक्ते प्रा. गंगाधर बनबरे, प्रदेश उपाध्यक्ष अभिमन्यू पवार, संघटक इंजिनिअर मनोज गायकवाड, प्रा.प्रेमकुमार बोके, संतोष गाजरे, सुधीर देशमुख,तुषार उमाळे,कैलास खॉंडेभराड,विजय वाढेकर आदींनी अभिनंदन केले आहे.

डॉ. सुदर्शन तारख हे परिवर्तनवादी चळवळीचे सक्रीय कार्यकर्ते म्हणून तसेच प्रसिद्ध वक्ते म्हणूनही परिचित आहेत.

## कर्मयोगी आबासाहेब चित्रपटाचा ट्रेलर बाईसाहेबांच्या हस्ते लाँच

# २५ ऑक्टोबर रोजी मराठीसह हिंदी भाषेत चित्रपट जगभर प्रदर्शित होणार

बीड (प्रतिनिधी) - सोलापूर जिल्ह्यातील सांगोला विधानसभा मतदारसंघात तब्बल ११ वेळा आमदार राहिलेले तसेच दोन वेळा राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी राहिलेले दिवंगत गणपतराव देशमुख उर्फ आबासाहेब यांच्या जीवनावर आधारित कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाचे ट्रेलर आबासाहेबांच्या पत्नी रतनबाई देशमुख उर्फ बाईसाहेब यांच्या हस्ते लॉन्च करण्यात आले. यावेळी त्यांनी चित्रपटाचे लेखक दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला तसेच चित्रपट छान बनविल्याची प्रतिक्रिया दिली. राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्त्व देणारे दमदार आमदार, राज्याचे कॅबिनेट मंत्री राहिलेल्या दिवंगत गणपतराव देशमुख म्हणजेच सर्वांचे आबासाहेब यांच्या जीवनकार्याचा वेध "कर्मयोगी आबासाहेब"



या चित्रपटातून घेतला गेला आहे. दिवंगत गणपतराव देशमुख यांच्या पत्नी रतनबाई देशमुख (बाईसाहेब) यांच्या हस्ते चित्रपटाचा ट्रेलर सांगोला येथे लॉंच करण्यात आला. याप्रसंगी उल्हास धायगुडे, बाळासाहेब झपके संपूर्ण सांगोलकर मंडळी आणि शेतकरी कामगार पक्षाचे नेते, कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते. २५ ऑक्टोबर रोजी मराठीसह हिंदी भाषेतही हा चित्रपट जगभरात प्रदर्शित होत आहे. मायका माऊली फिल्म प्रॉडक्शन आणि मुंबई क्रिएशन एंटरटेन्मेंटच्या मारुती तुळशीराम बनकर, बाळासाहेब महादेव एरंडे यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. अल्ताफ दादासाहेब शेख यांनी चित्रपटाचे लेखन, गीतलेखन आणि दिग्दर्शन केले आहे. अवधूत गुप्ते यांनी संगीत, कुमार डोंगरे यांनी छायांकन आणि संकलनाची जबाबदारी निभावली आहे. कुणाल गांजावाला, मनीष राजगिरे यांनी गाणी गायली आहेत. चित्रपटात अनिकेत विश्वासराव, हार्दिक जोशी, देविका दफ्तरदार, पृथ्विक प्रताप, विजय पाटकर, प्रदीप वेलणकर, सुरेश विश्वकर्मा, अरबाज शेख, तानाजी गलगुंडे, घनश्याम दरोडे (छोटा पुढारी), अहेमद देशमुख, वृंदा बाळ, निकिता सुखदेव, अली शेख, अल्ताफ दादासाहेब शेख यांच्या प्रमुख भूमिका आहेत. कार्यकारी निर्माता अमजद खान शेख असून प्रोडक्शन कंट्रोल सय्यद दादासो शेख यांनी काम पाहिले आहे.

# निवडणूक लढणार की पाडापाडी करणार, जरांगे पाटील उद्या घेणार निर्णय

निवडणूक लढायची की नाही याचा फैसला उद्या जरांगे पाटील घेणार आहेत. उद्या अंतरवाली सराटीत मराठा समाजाची बैठक आहे. त्या बैठकीआधी आज तज्ञांची बैठकही झाली. उमेदवार दिले किंवा पाडापाडीचा निर्णय झाला तरी, जरांगे फॅक्टर निवडणुकीत महत्वाचा ठरणार आहे. पुढच्या काही तासांत जरांगे पाटील आपला निर्णय घोषित करणार आहेत. निवडणूक लढणार की नाही, की पाडापाडी करणार याचा निर्णय घेण्याआधी अंतरवाली सराटीत जरांगेंनी काही अभ्यासकांचीही बैठक बोलावली होती. या बैठकीत निवडणुकांचा अनुभव असलेले निवडणूक प्रक्रिया तज्ञ, राजकीय अभ्यासक, वकील, निवृत्त अधिकारी, आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत जरांगे पाटलांची बैठक झाली. जरांगे पाटलांनी मराठा समाजाची बैठक बोलावलेली आहे. ज्यात निवडणुकीसंदर्भात जरांगे निर्णय घेणार आहेत. निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतलाच तर किती जागांवर जरांगे पाटील उमेदवार देणार ?. स्वत: निवडणूक लढणार का ?, स्वतंत्रच लढणार की कोणाला पाठींबा देणार ? हे जरांगे स्पष्ट करणार आहेत. आणि जर निवडणूक न लढता पाडीपाडीचा निर्णय झाला, तर कशाप्रकारे पाडापाडी करणार ?..फक्त महायुतीचेचे उमेदवार पाडणार की महाविकास आघाडीचेही उमेदवार पाडणार ?, कोणत्या उमेदवाराला पाठींबा देऊन पाडापाडी करणार का ? हे जरांगे सांगणार आहेत.

लोकसभा निवडणुकीत जरांगे पाटलांनी उमेदवार न दिल्यानं थेट फायदा महाविकास आघाडीला झाला. लोकसभेत मराठवाड्यातील 8 जागांपैकी 7 जागांवर महायुतीला फटका बसला आणि महाविकास आघाडीचा विजय झाला. विधानसभेचा मराठवाड्यात विधानसभेच्या 48 जागा आहेत. त्यामुळं जरांगेंनी लढण्याचा निर्णय घेतला तर महाविकास आघाडीला फटका बसण्याची चिन्हं आहेत. तर जरांगे पाटील आमच्या सोबत येतील असा विश्वास महाशक्ती परिवर्तन आघाडीच्या राजू शेट्टींनी म्हटलं आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षणाची मागणी जरांगेंची होती. तीच सरसकट आरक्षणाची मागणी मान्य न झाल्यानं जरांगेंनी आता सरकारच्या विरोधात लढण्याचा इशारा दिलाय. अर्थात सरकारमधून जरांगेंच्या निशाण्यावर अधिक वेळ फडणवीसच आहेत. विधानसभेच्या निवडणुकीत जरांगे फॅक्टर महत्वाचा असेल. कारण उमेदवार दिले किंवा पाडापाडीचा निर्णय घेतला. तरी महायुती आणि महाविकास आघाडी संदर्भात फायदा नुकसान होणारच आहे..



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २० ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com



# विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी थेट लॉरेन्स बिश्नोईला पत्र, या पक्षाकडून तिकीट?

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी उत्तर भारतीय विकास सेनाने लॉरेन्स बिश्नोईला पत्र लिहिले आहे.

गुजरातमधील साबरमती तुरुंगात बंद असलेल्या लॉरेन्स बिश्नोई याला पोस्टाने पत्र पाठवण्यात आले होते. उत्तर भारतीय विकास सेनेचे अध्यक्ष पं. सुनील शुक्ला यांनी साबरमती मध्यवर्ती कारागृहात पत्राद्वारे महाराष्ट्र विधानसभेचे तिकीट देण्याची घोषणा केली आहे. पं सुनील शुक्ला यांच्या राजकीय पक्ष "उत्तर भारतीय विकास सेनेने लॉरेन्स बिश्नोई याला तिकीट देण्याची घोषणा केली आहे.

लॉरेन्स बिश्नोई सध्या साबरमती मध्यवर्ती कारागृहात बंद आहे.

त्यामुळे लॉरेन्स बिश्नोई याला थेट पत्र पाठवत महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2024 मध्ये लढवण्याची विनंती या पक्षाने केली आहे. विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी अशा प्रकारे पत्र लिहिल्याने आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. सध्या देशात लॉरेन्स बिश्नोई चर्चेत आहे. लॉरेन्स बिश्नोई गँगचे शुटर वेगवेगळ्या प्रकरणात तुरुंगात आहेत. नुकताच राष्ट्रवादीचे नेते आणि माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणानंतर ही टोळी पुन्हा एकदा चर्चेत आली होती. लॉरेन्स बिश्नोई टोळीने बाबा सिद्दिकी यांच्या हत्येची जबाबदारी स्विकारली होती. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

बाबा सिद्दिकी हत्या प्रकरणात आतापर्यंत ९ लोकांना ताब्यात घेण्यात आले आहे. बाबा सिद्दिकी यांना खरंच लॉरेन्स बिश्नोई गँगने मारले आहे का याचा तपास सुरु आहे. सलमान खानचे वडील सलीम खान यांनी बाा सिद्दिकी यांची हत्या सलमान खानमुळे नाही तर जागेच्या वादातून झाल्याचं म्हटलं आहे.

लॉरेन्स बिश्नोई गँग सध्या अनेक राज्यांमध्ये सक्रिय असल्याचं समोर आलं आहे. फक्त हरियानाच नाही तर पंजाब, दिल्ली, राज्यस्थान या राज्यांमध्ये देखील लॉरेन्स बिश्नोई नेटवर्क काम करत असल्याचं बोललं जात आहे. लॉरेन्स बिश्नोई टोळीवर वेगवेगळ्या राज्यात गुन्हे दाखल आहेत.



लॉरेन्स बिश्नोई विरुद्ध 12 वर्षात 36 गुन्हेगारी खटले दाखल करण्यात आलेत. पंजाब, चंदीगड, हरियाणा, राजस्थान आणि दिल्ली येथे हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. 36 पैकी 21 प्रकरणांमध्ये अद्याप सुनावणी सुरू आहे, तर 9 प्रकरणांमध्ये त्याची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

## नवाब मलिकांवरुन अजित पवार गट आणि भाजपमध्ये मतभेद निर्माण होण्याचे चिन्हं

नवाब मलिकांवरुन अजित पवारांच्या राष्ट्रवादीसोबत भाजपचे पुन्हा मतभेद निर्माण होण्याचे चिन्हं आहेत. कारण भाजपकडून शेलारांनी नवाब मलिकांच्या उमेदवारीला उघड विरोध केलाय. दाऊदशी संबंधित व्यक्तीला तिकीट देणं भाजपला मान्य नाही, असं आशिष शेलार म्हणाले आहेत. नवाब मलिक अजित पवारांसोबत आहेत. सध्या ते मुंबईच्या अणुशक्तीनगरमधून आमदार आहेत, इथून त्यांच्या कन्या सना मलिकांना तिकीट मिळण्याची शक्यता आहे. तर मानखुर्द-शिवाजी नगर मतदारसंघातून अजित पवारांची राष्ट्रवादी नवाब मलिकांना तिकीट देऊ शकते. मात्र भाजपनं मलिकांना विरोध केलाय.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात, अंडरवर्ल्ड डॉन दाऊदशी संबंधित जमीन प्रकरणात, फडणवीसांनी मलिकांवर आरोप केले होते. त्यानंतर ईडीची कारवाई झाली आणि 15 महिने मलिक जेलमध्ये होते. तब्येतीच्या कारणास्तव त्यांना जामीन मिळाला. मात्र तोपर्यंत महाविकास आघाडीचं सरकार जावून महायुती सत्तेत आली आणि अजित पवारही सत्तेत सहभागी झाले होते. तसंच राष्ट्रवादीच्या फुटीनंतर मलिकांनी अजित पवारांना साथ दिली.

महिन्याभराआधीच अजित पवारांच्या जनसन्मान यात्रेतही मलिक सहभागी झाले. मलिक अजित पवारांसोबत दिल्यानंतर फडणवीसांनी आपण आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचंच म्हटलं होतं. आता मलिकांवरुन फडणवीसांनी नेमकी कोणती भूमिका काय होती, तेही पाहुयात.

अजित पवारांना लिहिलेल्या पत्रात फडणवीसांनी म्हटलंय की, सत्ता येते आणि जाते. पण सत्तेपेक्षा देश महत्वाचा आहे. मलिकांवरील आरोप सिद्ध न झाल्यास त्यांचे आपण जरुर स्वागत करावे. मात्र आरोप असताना त्यांना महायुतीचा भाग करणे हे योग्य होणार नाही, हे आमचे स्पष्ट मत आहे. मलिकांना देशद्रोह्यांशी संबंध असल्याच्या आरोपाखाली अटक झाली. तरीही त्यांना मंत्रिपदावर कायम ठेवणाऱ्या तत्कालीन मुख्यमंत्री आणि महाविकास आघाडी सरकारच्या विचारांशी आम्ही सहमती दाखवू शकणार नाही.



शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब मुख्यमंत्री व्हावेत व बीड जिल्हा शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख भावी आमदार बदामराव आबा पंडीत यांचे हात बळकट करण्यासाठी युवा नेते मनोज डोंगरे पाटील सह दामोदर मोरे, रितेश मुळे, सुरज पाडुळे, अविनाश खरात, विशाल हिवटे, आदर्श गव्हाणे गेवराई ते श्री.क्षेत्र तुळजापूर पायी वारी करत जगदंबे चरणी साकडे घालण्यासाठी चालले असता आज बीड शहरात जात असताना त्यांचे अभिनंदन करत बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने शिवसेनेचे दोन्ही जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व गणेश भाऊ वरेकर यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख अभिषेक दिवे, सखाराम तात्या मोहिते,विनोद गुंड पाटील,दीपक घोडके पाटील, अजय गायकवाड, अय्युब भाई पठाण,ऋषी भैय्या गिरी, बापू सातपुते,गोरख भटे,राकेश ढोले, रत्नाकर येवले उपस्थित होते...!!



वडवणी येथे सोमनाथ बडे सर यांची औरंगाबाद विभागीय शिक्षण मंडळ, बोर्ड मेंबर पदी निवड झाल्यानंतर माजलगांव मतदार संघाचे नेते मा.रमेशराव आडसकर साहेब यांचे चिरंजीव रंजीत दादा आडसकर यांनी सत्कार केला या वेळी त्यांच्या बरोबर. सुशिलराव शेळके, पोपटराव शेंडगे, जमाले साहेब, गोविंदराव मस्के, राम पाटील सावंत, सुग्रिव मुंडे,शिवाजीराव मायकर.व सहकारी.!!

## लॉरेन्स बिश्नोईच्या धमक्यांवर अखेर सलमानं मौन सोडलं; पहिल्यांदाच बोलला,

अभिनेता सलमान खानचा रिॲलिटी शो बिग बॉसचा सीजन 18 सुरू झाला आहे. मात्र जसा हा शो सुरू झाला तशा सलमान खानच्या अडचणी देखील वाढल्या आहेत.राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दिकी यांच्यावर गोळीबार करण्यात आला, या घटनेत त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनं खळबळ उडाली आहे. बाबा सिद्दिकी हे सलमान खानचे निकटवर्तीय होते.या हत्येची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई गँगनं स्विकारली आहे.या घटनेनंतर सलमान खानच्या सुरक्षेमध्ये आणखी वाढ करण्यात आली आहे. याचदरम्यान सलमानला देखील धमकी देण्यात आली आहे. मात्र या धमकीनंतर देखील सलमाननं बिग बॉसचं चित्रिकरण सुरूच ठेवलं आहे. बिग बॉसच्या विकेंडचा एक व्हिडीओ समोर आला आहे. ज्यामध्ये सलमान खान शिल्पा शिरोडकरची समजूत घालताना दिसत आहे. असं म्हटलं आहे की या व्हिडीओच्या माध्यमातून सलमान खान याने लॉरेन्स बिश्नोई गँगकडून मिळत असलेल्या धमक्यांवर आपलं मौन तोडलं आहे.



या व्हिडीओच्या प्रोमोमध्ये सलमान खाननं म्हटलं आहे की, मला आज या शोला यायचं नव्हतं मात्र काम करावं लागतं त्यामुळे यावं लागलं.

### काय आहे हा व्हिडीओ

या व्हिडीओमध्ये सलमान खान शिल्पा शिरोडकरला म्हटला की आय हेट टीयर्स शिल्पा, जेव्हा तुझी मुलगी जेवणावर राग काढत होती तेव्हा तू तीला काय सांगत होतीस. यावर बोलताना शिल्पाने म्हटलं की जेवणावर राग नाही तर ॲटिट्यूडवर राग आहे. तेव्हा सलमान तिला म्हणाला की मग त्या ॲटिट्यूडवर राग काढ. फिलिंग्ससोबत तुमचं कोणतही नातं या घरात नसलं पाहिजे.

### सलमानने मौन तोडलं

शिल्पाची समजून काढताना सलमानने म्हटलं की, जशी की माझी फिलिंग आहे, मला इथे यायचच नव्हतं, पण काम आहे. एखाद्या मानसाला जे करावं लागतं ते करावंच लागतं. सलमान खानच्या या वक्तव्यावरून आता त्याचे फॅन असा अंदाज लावत आहेत की ही प्रतिक्रिया त्याने त्याच्या आयुष्यात सुरू असलेल्या घटनांवर दिली आहे.

# मी आमदार झालो तेव्हा सर्वधर्म समभावाची शिकवण दिली अन दंगली थांबल्या

## रामदास कदमांचा दावा

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमध्ये बैठकांचं सत्र सुरू आहे. महायुतीमध्ये भाजपच मोठा भाऊ असल्याचं आता जवळपास स्पष्ट झालं आहे. त्यामुळे आता महायुतीमधील दोन प्रमुख घटक पक्ष असलेल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्या वाट्याला किती जागा येणार याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. तसेच ज्या इच्छूक उमेदवारांना तिकीट मिळणार नाही त्यांची बंडखोरी रोखण्याचं देखील आव्हान महायुतीतील नेत्यांसमोर असणार आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शिवसेना नेते रामदास कदम यांची महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. तसंच मी आमदार झाल्यानंतर खेडमधील दंगली थांबल्या असा दावा देखील त्यांनी केला आहे.

नेमकं काय म्हणाले कदम?

अजून जागा वाटप अधिकृत झालेलं नाहीये, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, नरेंद्र मोदी अमित शहा यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. जे काही जागावाटप होईल याबाबत शिवसेनेमध्ये माझ्यासह कोणाचीही



नाराजी नसेल. ज्या काही जागा मिळतील त्यातील जास्तीत जास्त जागा कशा निवडून आणायच्या यासाठी सगळे प्रयत्न करणार आहेत असं कदम यांनी म्हटलं आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, दापोलीमधील भाजपच्या काही कार्यकर्त्यांना भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी समजून सांगण्याची गरज आहे. या निवडणुकांमध्ये निकाल लागेल तेव्हा उद्धव ठाकरे गट असू द्यात, शरद पवार राष्ट्रवादी असू दे किंवा कॉँग्रेस यांचा नायनाट झालेला दिसेल. योगेश कदम यांच्यासमोर जो उमेदवार उभा राहील त्याचं डिपॉझिट सुद्धा राहणार नाही, असं कदम यांनी म्हटलं आहे.

तसेच आपण आमदार झाल्यानंतर खेडमधील दंगली थांबल्या असा दावा देखील कदम यांनी केला आहे. 1990 सालामध्ये तीन-तीन गाड्या एसआरपीच्या खेडमध्ये असायच्या. गणपती शिमगा आला की दंगल व्हायची. मी जेव्हा आमदार म्हणून निवडून आलो तेव्हापासून दंगली थांबल्या. सर्वधर्म समभावाची शिकवण मी दिली असा दावा देखील यावेळी कदम यांनी केला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
रविवार २० ऑक्टोबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# माजलगाव विधानसभेच्या मतदार संघाच्या आखाड्यात बाबरी मुंडे या युवकांचा आवाज, ग्रामीण भागातील जनता देऊ लागली आशीर्वाद

## युवा जनांचा तोच राजा , नाव ज्याचे छातीवर बाबरी मुंडे आमदार शोभतो, या माजलगाव च्या धर्तीवर




**माजलगाव, , प्रतिनिधी**

युवकांचा लाडका , प्रत्येक गावात आपल्या कामाच्या माध्यमातून भेटी ,गाठी घेणे त्याला ते सहाजिकच आहे. कारण तो जनतेतील नेता आहे. नाही त्याला कोणत्या पदाची गरज पडली नाही कुठल्या आदेशाची गरज तरी तो सदैव जनतेमध्ये मिळून मिसळून राहिलेला युवा नेता बाबरी मुंडे आपल्या कामाच्या ख्यातीने प्रचंड चर्चेत आला. नुकतेच महाराष्ट्र राज्यातील विधानसभेचे बिगुल वाजले आहे. प्रत्येक पक्षाची आता पळापळ सुरू झाली आहे. प्रत्येकाचे डोळे आता टीव्ही कडे लागले आहे की कोणता पक्ष कोणाला तिकीट देतोय ते अन जनतेचे ही नेत्याकडे डोळे लागले आहे की आता कोणता नेता आपल्या मतदार संघाचा आमदार करायचा ते. नुकतीच आचारसंहिता लागली आणि नेत्यांचे आता धाबे दणाणले आहेत , प्रत्येक जण आप आपल्या पध्दतीने ज्याचा तो प्रचार करत आहे पण येथील जनता कोणाला खुर्ची वरती बसवते याकडे नेत्यांचे देखील लक्ष लागले आहे , माजलगाव मतदार संघात अनेक जण भावी आमदार म्हणून गुडघ्याला बाशिंग बांधून बसले आहेत पण जनता काय करते यांच्यावरच आता अवलंबून आहे. आज जर गाव गाड्यामध्ये मध्ये गेले तर कोणाला विचारले तर कोण होईल यावेळेस माजलगाव विधानसभेचा आमदार तर , लोक ठासून सांगतात की , आम्ही बाबरी शेठ मुंडे सोडता कोणता ही आमदार करणार नाहीत आज च्या घडीला पाहता माजलगाव विधानसभेत लोकसभेची जखम भरून काढतात काय अशी वास्तविक परस्थिती निर्माण झाली आहे . आज पाहिले तर जनते मध्ये धडाडीचा कार्यकर्ता , लोकांच्या सुख- दुखात प्रत्येक कार्यक्रमात बाबरी शेठ हे उपस्थिती दर्शवतात , लोकांची देखील ही भावना आहे की एक नवीन नेतृत्व पुढे जावे , नेहमी समाजकार्यात अग्रेसर



असतो आज बाबरी शेठ मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे युवकांची साथ आहे. याच युवकांच्या साथीमुळे बाबरी शेठ मुंडे यांनी माजलगाव विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्धार केला , तसेच मी भारतीय जनता पक्षाकडे उमेदवारी मागून धरणार आहे नाही दिली तरी मी यावेळी अपक्ष लढेल पण माजलगाव विधानसभेची निवडणूकच लढवणार असल्याचे त्यांनी बोलून दाखवले आहे.मला कोणाचाही आदेश किंवा सल्ला आला तरी मी यावेळी माघार घेणार नाही म्हणजे नाहीच , बाबरी शेठ मुंडे यांनी माजलगाव मतदार संघात फक्त दोनच आठडवड्यात आपली एक क्रेझ निर्माण केली आहे की यावेळेला आपण निवडणुकीच्या रिंगणात रुतरणार आहे. बाबरी शेठ मुंडे यांनी माजलगाव मतदार संघात जनसंपर्क कार्यालय देखील उघडले आहे. मला माझ्या जनतेवर्ती पूर्ण विश्वास आहे की मला जनता मतदान रुपी आशीर्वाद देणार आहेच, पण मी जनतेला हे सांगत आहे की मी जर माजलगाव विधानसभा मतदारसंघाचा आमदार जर झालो तर या मतदार संघात एक विकासाची गंगा वाहून दाखवेल , येथील युवकांना रोजगार , मिळवून देईल, येथील जनतेची सेवा करण्यास मला संधी द्यावी अशी मागणी त्यांनी गावभेटी दौऱ्यात केली आहे.



## ! शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी झगडणारा बाबरी मुंडे !

शेतकरी कधीही अडचणीच्या काळात सापडलेला असतो त्यात बाबरी मुंडेंची शेतकऱ्यांना असते साथ , तेव्हा बाबरी शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी हा रस्त्यावर , आंदोलन छेडतो तर कधी विमा कंपन्यांच्या अधिकाऱ्यांशी भांडतो , शेतकऱ्यांचे प्रश्न नेहमी सरकार दरबारी मांडणारा बाबरी मुंडे हा आता शेतकऱ्यांचा देखील गळ्यातील ताईत बनला आहे. बाबरी मुंडे यांच्याकडे कुठलेही पद नसताना शेतकऱ्यांसाठी सतत मागणी लावून धरत बाबरी शेठ मुंडे हे महाराष्ट्रातील सर्वांच असणारे सभागृह विधानसभा असेल , विधानपरिषद मधील आमदार मंत्री यांच्या भेटी , गाठी घेऊन त्यांना विधानसभेत आवाज उठवण्याचे , आव्हान करत होते. शेतकऱ्यांच्या व्यथा तुम्ही सभागृहात मांडा अश्या वेळी बाबरी मुंडे हे शेतकऱ्यांसाठी झगडणारा युवा आमदार व्हावा असेही माजलगाव विधानसभा मतदारसंघात पाहिले जात आहे.

## ! पंकजाताई चा लाडका बाबरी मुंडे !



मागील काही काळामध्ये पंकजाताई वरती भारतीय जनता पक्षाकडून अन्याय होत असल्याचे बोलले जात होते तेव्हा बाबरी शेठ मुंडे यांनी कार्यकर्त्यांन मध्ये एक विश्वास निर्माण केला , मागील काही काळामध्ये लोकसभेची निवडणूक झाली त्यामध्ये ताईंचा भारतीय जनता पक्षाकडून ताईंचे , पुन्हा पुनर्वसन करण्यात आले , बीड लोकसभेची निवडणूक ही अटीतटीची झाली , या निवडणुकी मध्ये जातीय समीकरणे जुळून आल्यामुळे , माजी मंत्री पंकजाताई याना त्याला मोठे तोंड द्यावे लागले , त्यातच ताईंचा लाडका असलेला बाबरी मुंडे यांनी लोकांच्या दाराला साल ठेवली नव्हती एवढा पंकजाताई यांचा प्रचार केला होता , त्यामध्ये बाबरी शेठ मुंडे नि पंकजाताई ला माजलगाव विधानसभे मधून डोंगर पट्यातून , गाव, गाडा, तांडा, वाडी, वस्त्यातून, प्रचंड मताधिक्य मिळवून दिले त्यामध्ये देखील बाबरी शेठ मुंडे यांचा सिहांचा वाटा आहे. त्यामध्ये ताईंचा काहीशा फरकाने निवडणुकीमध्ये ताईंचा पराभव झाला , त्यामध्ये देखील बाबरी मुंडे खचले नाही तर पुन्हा त्याच ताकदीने उमेदीने मैदानात उतरले आणि भारतीय जनता पक्ष व अनेक नेत्यांना त्यांनी आव्हाहन केले की , पंकजाताई चे पुनर्वसन नाही झाले तर आम्ही एकही मत हे भाजप ला किंवा इतर कुठल्याही पक्षाला देणार नाही , त्यावेळेस ताईंचा सन्मान करत भारतीय जनता पक्षाने पंकजाताई यांना विधानपरिषद वरती घेण्यात आले. तेव्हा बाबरी मुंडे शांत झाले याच कारणाने बाबरी मुंडेंनी आता माजलगाव विधानसभेच रणांगण सोडायच नाही असे ठरवले आहे.

## वडवणी नगरपंचायत निवडणुकीत महत्वाची भूमिका बजावून पार पाडली.

गेल्या काही काळामध्ये वडवणी नगरपंचायत ची निवडणूक झाली या निवडणुकी मध्ये अनेक मंत्री , आमदार , खासदार येऊन प्रचार करत होते, त्याच वेळेस बाबरी शेठ मुंडे हाबुक ठोकून चौका, चौकात जाऊन पाच वर्षात वडवणी नगरपंचायत मध्ये काय विकास केला तर ते घरो घरी , दारोदारी जाऊन सांगत होते , बाबरी शेठ मुंडे यांच्या नेत्रत्वात अनेक निवडणूका पार पडल्या आणि त्या जागा देखील त्यांनी निवडणून आणल्या , वडवणी नगरपंचायत मध्ये जोरदार अशी लढत सुरू होती , या ठिकाणी अनेक महाराष्ट्र राज्यातील मंत्री येऊन त्यांनी येथील प्रचार केला पण त्यांना ते जड जाऊ लागले होते ,अशातच बाबरी मुंडे यांनी आपल्या कामातून , ही निवडणूक लढली होती. वडवणी नगरपंचायत मध्ये बाबरी शेठ मुंडे यांच्यावर्ती व त्यांच्या वडील राजेभाऊ अण्णा मुंडे यांच्या वरती देखील अनेक आरोप , खालच्या पातळीवर जाऊन राजकारण झाले होते पण बाबरी मुंडे यांनी शांततेची भूमिका घेतली होती व निवडणुकीला सामोरे गेले होते. आशा या संयमी नेत्याला पाहून माजलगाव विधानसभेत जनता बाबरी मुंडे यांच्याकडे युवा आमदार म्हणून जनता पाहत आहे.

## क्रिकेट प्रेमी बाबरी शेठ मुंडे

वडवणी प्रीमियम लीग च्या माध्यमातून अनेक अनेक प्रेक्षकांचे मन जिंकणारे बाबरी मुंडे , हे आपल्या वाढदिवसानिम्मित वडवणी या ठिकाणी अनेक विविध स्पर्धा आयोजित करतात, याच स्पर्धेच्या माध्यमातून ते युवकांन मध्ये एक ऊर्जा निर्माण करतात , वाढदिवसाच्या माध्यमातून अनेक राजकीय नेत्यांच्या भूमिका देखील स्पष्ट होतात , बाबरी मुंडे आपली एक वेगळीच क्रेझ निर्माण करतात आज युवा कार्यकर्त्यांच्या जना मनात बाबरी शेठ हे नाव ठासून भरले गेले आहे. आपल्या कामाच्या ख्यातीतून बाबरी शेठ मुंडे जिल्ह्यात प्रचलित आहेत , माजलगाव विधानसभेला बाबरी शेठ मुंडे हे आमदार याच्या रूपाने झाल्यास नक्कीच माजलगाव चा विकास हा होणार आहे असेही मतदार संघातील जनता बोलत आहे.



## महिला व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कायम अग्रेसर.

वडवणी शहरात अनेक खेड्यातील, गावातील , वाड्या , वस्त्या , तांड्यातील , विद्यार्थी हे वडवणी या शहरात शिक्षण घेण्यासाठी येतात त्यांच्या सुरक्षे साठी बाबरी शेठ , नेहमी पोलीस स्टेशन असेल आणखी शाळेतील ,शिक्षक यांना ते नेहमी सूचना करतात , तसेच शहरात शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना कुठला त्रास होणार नाही , कोणाकडून त्रास होत असेल तर विद्यार्थी देखील बाबरी मुंडे कडे येतात , कुठलीही अडचण असली की नाव पुढे फक्त बाबरी शेठ मुंडे च , सध्या महाराष्ट्र मध्ये विद्यार्थ्यांच्या बाबतीत अनेक घटना घडत आहेत , आशा घटना कुठे घडू नये तसेच शहराचे नाव बदनाम होऊ नये , म्हणून बाबरी मुंडे हे नेहमी आपली एक चक्कर का होईना ही शाळेकडे महाविद्यालय कडे करत असतात , कोणाच्या काही तक्रारी असतील तर त्यांनी थेट माझ्याशी सांगावे , याच सुचनामुळे विदयार्थी यांच्यामध्ये ऊर्जा निर्माण होते. विद्यार्थी देखील छातीठोक पणे मुले - मुली हे शहरात शिक्षण घेतात.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com